विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ मार्च २०२५.

अधिसूचना

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३.

क्रमांक न्यास्थाप-२०२३/प्र.क्र. १७४/कार्यासन-१२.—भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७ आणि कलम ८ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून; आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर महसुली तालुक्याशी संबंधित असतील तेथवर, त्यामध्ये, अंशतः फेरबदल करून, मुंबई येथील अधिकारितेच्या उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक ९ मार्च, २०२५ पासून, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर महसुली तालुक्यासाठी गंगापूर सत्र विभागाची, त्याच्या सीमेअंतर्गत उद्‌भवणाऱ्या प्रकरणांची चौकशी करण्यासाठी निर्मिती करीत आहे. सत्र न्यायाधीश, औरंगाबाद हे, गंगापूर येथील सत्र उपविभागाचे देखील सत्र न्यायाधीश असतील आणि त्यास, उक्त सत्र उपविभागाकडील प्रकरणे स्वतः निकाली काढण्याचे किंवा सक्षम अधिकारिता असलेल्या इतर कोणत्याही न्यायालयाकडे सोपविण्याचे अथवा त्यास योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, गंगापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीशाकडे सोपविण्याचे अधिकार असतील.

IndiaCode

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विलास वसंत गायकवाड,
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 5th March 2025.

NOTIFICATION

BHARATIYA NAGRIK SURAKSHA SANHITA, 2023.

No. Nyasthapa 2023/CR-174/Desk XII.—In exercise of the powers conferred by section 7 and 8 of Bhartiya Nagarik Suraksha Sanhita,2023 (46 of 2023), in its application to the State of Maharashtra and of all other powers enabling it in this behalf; and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to revenue tahsil of Gangapur in Chhatrapati Sambhajinagar District, the Government of Maharashtra in consultation with the High Court of Judicature at Bombay, hereby creates with effect from the 9th March, 2025, sessions division, Gangapur in Chhatrapati Sambhajinagar District for the revenue tahasil of Gangapur for trial of cases arising within the limits of the said sessions division. The Sessions Judge, Aurangabad shall also be the Sessions judge for the sessions sub-division at Gangapur and shall have the powers to withdraw unto himself or to assign to any other Court of competent jurisdiction, the cases from the said sessions sub division, or to assign unto the Additional Sessions Judge at Gangapur, any such cases as he thinks fit.

.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

IndiaCode

VILAS V. GAIKWAD,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to Government.